।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव .

# NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON - 425 001

=======================================================

## परीपत्रक 05/2018

विषय :- अभियांत्रीकी विद्याशाखेशी संबधीत Photocopy/Verification/Redressal ची कार्यवाही ऑनलाईन करणेबाबत.

सर्व संबंधीतांना अवगत आहे की, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाव्दारे अध्यादेश क्र.134/2007 नुसार Photocopy/Verification/Redressal ची कार्यवाही केली जाते. आतापर्यंत सदरहू कार्यवाहीमध्ये विद्यार्थी महाविद्यालयात अर्ज जमा करत होते व महाविद्यालय Online Entry करुन अर्ज सादर करत होते. ही प्रक्रिया शीघ्र गतीने व्हावी व त्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीचा वापर करावा असे विद्यापीठ परिक्षा प्रशासनाच्या विचाराधीन होते.

उपरोक्त प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे कार्यपध्दत अवलंबण्यात यावी.

Photocopy/Verification/Redressal साठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी अभियांत्रीकी विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर जाऊन student corner या link वर Application for Photocopy/Verification/Redressal मध्ये उपलब्ध असलेल्या Student Manual येथे नमूद कार्यपध्दतीनुसार (Procedure) अर्ज करावेत. तसेच याच लिंकवर नियमानुसार आवश्यक ते शुल्क देखील ऑनलाईन पध्दतीने भरावे. पुढील प्रक्रिया/कार्यवाहीबाबत विद्यार्थ्यांना sms व्दारे कळविले जाईल. याकामी खालील मुदतीनुसार ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

| अ.क्र. | अर्जाचे प्रकार | मुदत |
|---|---|---|
| 01 | Photocopy( with verification) | 21.02.2018 |
| 02 | Only Verification | 27.02.2018 |
| 03 | Redressal - Challenge to Valuation | फोटोकॉपी मिळाल्यापासून सात दिवस |

तथापी, खालील विषयांचे Photocopy/Verification/Redressal चे अर्ज छापील नमुन्यात महाविद्यालयामार्फत नियमानुसार आवश्यक त्या शुल्कासह manually सादर करावेत.

| वर्ग/शाखा | विषय सांकेतांक | विषय |
|---|---|---|
| FE | 102115 | Engineering Drawing & Elements of Mechanical Engg. (New) |
| SE (Mech) | 124112 | Theory of Machines - I (Also old Sem.IV Equivalence) |
| SE (Civil) | 114114 | Building Design & Drawing (Old Sem.IV Equivalence) |
| SE (Auto) | 214112 | Theory of Machines - I (Also old Sem.IV Equivalence) |
| TE (Mech) | 125104 | Theory of Machines - II (Also old Sem.V Equivalence) |
| TE (Auto) | 215104 | Theory of Machines - II (Also old Sem.V Equivalence) |

..2..

करिता, अभियांत्रिकी विद्याशाखेच्या माहे नोव्हे/डिसे.2017 या सत्राच्या परीक्षांच्या निकालापासून Photocopy/Verification/Redressal साठी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही/कार्यपध्दत निश्चित करण्यात आली आहे. याकामी आवश्यक असलेल्या शुल्काबाबत विद्यापीठाने यापूर्वी निर्गमीत केलेले परीपत्रक/पत्रांमधील अटी/शर्ती व शुल्क लागू राहतील याची कृपया सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सर्व मा.प्राचार्यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त परीपत्रक सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर संबधितांच्या निदर्शनास आणून विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

याबाबतीत विद्यार्थ्यास तांत्रिक अडचण आल्यास 0257- 2257331 या क्रमांकावर सकाळी 10 ते संध्याकाळी 5 या वेळेत संपर्क साधावा.

स्थळ: उमवि, जळगाव
दिनांक: 06/02/2018
जा.क्र.उमवि/7ब/299/2018

(प्रा.डॉ.अं.बा.चौधरी)
प्र. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रति,

१. मा.प्राचार्य, उमविशी संलग्नित सर्व अभियांत्रिकी महाविद्यालये
२. मा.वित्त व लेखाधिकारी, उमवि., जळगाव
३. मा.प्रमुख, संगणक केंद्र, परीक्षा विभाग, उमवि., जळगाव.
४. सहायक कुलसचिव, परीक्षा गोपनीय उत्तरार्ध, उमवि, जळगाव.